रासेयो कॉलेज कोड
सी—४१

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, विळदघाट, अहमदनगर —४१४१११

## राष्ट्रीय सेवा योजना
## विशेष हिवाळी शिबीर अहवाल

स्थळ— अकोळनेर, ता.नगर जि.अहमदनगर
कालावधी— ०८/०१/२०२४ ते १४/०१/२०२४




<u>दि. ०८ जानेवारी २०२४</u> :— राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरामध्ये गावची स्वच्छता करण्यात आली, मंदिर परिसर, शाळेचा परिसर तसेच ग्रामपंचायत येथील सर्व ठिकाणचा कचरा साफ करुन विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबविले. सर्व परिसर खुलून दिसायला लागला.

<u>दि. ०९ जानेवारी २०२४</u> :— राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरामध्ये गावचा विकास घडवून आणण्याची ताकद असते. व यामध्ये गांवाचा सहभाग व ग्रामस्थांची भूमिका हा भाग विशेष महत्वाचा आहे असे प्रतिपादन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय नाईक व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.वाय. पवार यांनी केले. अकोळनेर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीराचे उद्घाटन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय नाईक व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.वाय. पवार यांचे हस्ते दि. ०९ जानेवारी रोजी झाले, त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, एम.बी.ए. सेंटर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त

Scanned with OKEN Scanner


या शिबीरासाठी डॉ. विखे पाटील फौंडेशनचे विश्वस्त व मुख्य कार्यकारी अधिकारी मा.खासदार डॉ. सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ. बी. सदानंदा, डायरेक्टर (टेक्निकल) डॉ. पी.एम.गायकवाड, विखे पा. फौंडेशनचे डेप्युटी डायरेक्टर–टेक्निकल प्रा. सुनिल कल्हापुरे तसेच अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. उदय पी. नाईक, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.वाय. पवार, व एम.बी.ए. सेंटरचे डायरेक्टर डॉ. संजय धर्माधिकारी यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले.

या हिवाळी शिबीरासाठी सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले.

दि. १० जानेवारी २०२४ :–

कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळची दिनचर्या पूर्ण करुन अल्पोपहारानंतर सर्व प्राध्यापक व सर्व मुले यांनी दिवशी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध प्रकारच्या रक्त तपासण्या, कॅन्सर टयुमर टेस्ट, डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया सिव्हील हॉस्पिटल व हिंदसेवा लॅब यांच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले. यामध्ये गावातील तरुण, वयोवृध्द व्यक्ति तसेच जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेवकांची विविध रक्ततपासण्या केल्या गेल्या. जवळपास ५०० गावक–यांनी यामध्ये सहभाग घेवून आरोग्य शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.






उत्तर जिल्हा समन्वयक  राष्ट्रीय सेवा योजना डॉ. फलफले यांनी विशेष शिबीराला अकोळनेर येथे सदिच्छा भेट दिली.

दिवसभरातील कामांचा आढावा व नंतरच्या दिवशीच्या कामाचे आयोजन करण्यात आले.

<u>दि. ११ जानेवारी २०२४</u> :—

कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळची दिनचर्या पूर्ण करुन अल्पोपहारानंतर सर्व प्राध्यापक व सर्व मुले यांनी गांवातील श्रमदान, जलस्त्रोत साफसफाई तसेच धार्मिक स्थळांची स्वच्छता हा उपक्रम हाती घेतला. या उपक्रमामध्ये गावचे गांवकरी सुध्दा सहभागी झाले होते.



सायंकाळी पाच वाजता **"लेक वाचवा, देश वाचवा"** संबंधी रॅली काढण्यात आली.




<u>दि. १२ जानेवारी २०२४</u> :–

कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळची दिनचर्या पूर्ण करुन अल्पोपहारानंतर सर्व प्राध्यापक व सर्व मुले यांनी गांवातील श्रमदान, स्वच्छता अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय तसेच गावातील विविध परिसरातील स्वच्छता करण्यात आली.



यानंतर स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व प्रा. सचिन राऊत, कोआर्डीनेटर, साऊथ वेस्ट झोन, सुदर्शन न्यूज चॅनल उपस्थित होते. तसेच या दिवशी राष्ट्रीय युवा दिन म्हणून स्वामी विवेकानंदांचे विचार यावर प्रा. सचिन राऊत यांचे व्याख्यान झाले.



संत दासगणु महाराज मंदिर समिती सदस्य श्री. सतिश गायकवाड यांनी स्वयंसेवकांची राहण्याची व्यवस्था मंदिरामध्ये करुन दिली. तसेच मुलांना गावक–यांसमवेत संत दासगणु महाराजांच्या आरतीचा लाभ सातही दिवस मिळाला त्याबद्दल कार्यक्रम अधिकारी यांनी त्यांचा सांगता समारोहात सत्कार केला.

सौ. सविताताई मेहेत्रे, सरपंच, अकोळनेर यांनी सर्व स्वयंसेवकांना संक्रांतीनिमित्त शुभेच्छा देवून तिळगूळाचे वाटप केले. तसेच महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजीत केला व महिला कार्यक्रम अधिकारी यांचा सत्कार केला.

कार्यक्रम अधिकारी प्रा. संजय जोशी यांनी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व मंदिर समिती व गावक–यांच्या सहकार्याबद्दल तिन्ही महाविद्यालयांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त केले व यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर गावामधून शिबीराचे अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे प्रस्थान झाले.

Program officer
National Service Scheme
Dr. Vithalrao Vikhe Patil College of Engineering,
Ahmednagar

(डॉ. निळकंठ देशपांडे )

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

Principal
College of Engineering
Ahmednagar

( डॉ. उदय पी. नाईक )

प्राचार्य
अभियांत्रिकी महाविद्यालय, अ.नगर

Scanned with OKEN Scanner